दिव्य मराठी
अकोला सिटी 27-10-2023

# दिव्य मराठी

# 27/10/23

## पळशी येथे सायबर सुरक्षेविषयी कार्यशाळा, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



कार्यशाळेत सहभागी झालेले विद्यार्थी व मान्यवर.

**अकोला** | पळशी येथील महात्मा फुले उच्च माध्यमिक कला, वाणिज्य व विज्ञान विद्यालयात सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सायबर क्राईम आणि त्याचे विविध प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात , इंटरनेट आणि मोबाईल फोनच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, ऑनलाईन गेमिंगमुळे होणारे नुकसान, एटीएम आणि व्हॉईस क्लोनिंगमुळे होणारी फसवणूक आणि फसवणूक होऊन नये, यासाठी घ्यावयाची काळीजी यावर मार्गशर्दनक कऱ्यात आले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची तज्ज्ञांनी उत्तरे देऊन मोबाइल फोनच्या योग्य आणि कमीत कमी वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सहकार्याने व 'क्विक हिल फाउंडेशन, महाराष्ट्र सायबर सेलच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू, उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच. जे. खरात यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केली होती. यामध्ये सायबर वॉरियर्स प्रतिक्षा हिवराळे व प्रियंका जाधव यांनी मार्गदर्शन केले.